# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:25.07.2026** **वार:शनिवार**

---

- **आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा; पंढरपूरमध्ये विठ्ठलभक्तांची मांदियाळी**
- **पंढरपूर कॉरिडॉरचं काम करताना कोणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही; मुख्यमंत्र्यांची ग्वाही**
- **पेपरफुटी आणि परीक्षेतल्या गैरप्रकारांतील दोषीना कठोर शिक्षा करणाऱ्या विधेयकाच्या मसुद्याला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी**
- **परीक्षांमधल्या गैरप्रकारांशी संबंधित गुन्ह्यांच्या खटल्यांच्या सुनावणीसाठी छत्रपती संभाजी नगर आणि नागपूर खंडपीठांमध्ये विशेष न्यायालय स्थापन**
- **आणि**
- **भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात आज दुसरा टी ट्वेंटी क्रिकेट सामना.**

**<u>आषाढी</u>**

आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरमध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पहाटे सपत्नीक केली. त्यांच्या समवेत यंदाचे धाराशिव जिल्हयातील मानाचे वारकरी बाबासाहेब माने, आणि प्रभावती माने यांनीही विठूरायाची पूजा केली. त्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी दरवर्षी वाढणारी भक्तांची गर्दी पाहता त्यांना उत्तम सोयी उपलब्ध करून देण्यासाठी मंदिर परिसर विकासाचं काम पंढरपूर कॉरिडॉरच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. हे काम करताना कोणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही, सर्वांचं योग्य पुनर्वसन करून हे काम येत्या अडीच वर्षांत पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

पाणी, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, प्लास्टिकमुक्त वारी, वृक्षसंवर्धन आदी विषयांवर प्रबोधन करणाऱ्या दिंड्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.

आषाढी एकादशीसाठी पंढरपूरमध्ये लाखो भाविक दाखल झाले असून विठूरायाच्या गजरानं पंढरी दुमदुमून गेली आहे.

तत्पूर्वी काल मुख्यमंत्र्यांनी पंढरपूरमध्ये विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला आणि वारकऱ्यांशी संवाद साधला. पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आयोजित राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचं उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत' सोलापूर जिल्ह्यातील सात शेतकऱ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात कर्जमुक्तीचं प्रमाणपत्र आणि जिल्हा बँकेच्यावतीनं नव्यानं पीककर्जाचे धनादेश

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. देशातली ही सर्वात मोठी कर्जमाफी असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. ...

**देशातील सगळ्यात मोठी कर्जमाफी या ठिकाणी घोषित केली आणि अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना घोषित केली. 56 लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार आहे. त्यांनी नियमित कर्ज भरलं त्यांना पन्नास हजार रुपये त्यांच्या अकाउंटला आम्ही देतो आहोत. सहकार विभागाने पहिली यादी घोषित केली. 17 लाख शेतकऱ्यांची पहिली यादी 13,000 कोटी रुपये आपण त्या शेतकऱ्यांना या ठिकाणी देतो आहोत. आणि आता दुसऱ्या यादीचे काम सुरु झालंय.**

भविष्यामध्ये शेतीच्या क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचं महत्त्व ओळखून, देशात पहिल्यांदा महाराष्ट्रानं शेतकऱ्यांसाठी 'महा विस्तार' नावाचं ॲप तयार केलं आहे. जवळपास 50 लाख शेतकऱ्यांनी महा विस्तारवर नोंदणी केली असून उर्वरित शेतकऱ्यांनीही या ॲपवर नोंदणी करावी असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

**हवाईरुग्णवाहिका**

आषाढी वारीत यंदा प्रथमच हवाई रुग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. एका भाविकाला अस्वस्थ वाटू लागल्यानं काल या रुग्णवाहिकेद्वारे पंढरपूरहून सोलापूरला हलवण्यात आलं. पर्यावरणाची वारी पंढरीच्या दारी उपक्रमाचा समारोपही मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत काल झाला.

**धाराशिव**

धाराशिव जिल्ह्यात खरीप पिकांची 74 टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे, मात्र जिल्ह्याला अजूनही दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. ऐकुया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून ..

**धाराशिव जिल्ह्यात चालू वर्षी जुलै महिना संपत आला तरीही अवघा 204 मिलिमीटर पाऊस झाला आहे. जिल्ह्यांवर दुष्काळाचे भीषण सावट येण्याची भिती लक्षात घेऊन प्रशासनानं खबरदारीच्या उपायोजना सुरू केल्या आहेत. जिल्हा प्रशासनाने खरिपाचे निर्धारित केलेल्या पाच लाख 50 हजार 580 हेक्टर क्षेत्रापैकी चार लाख दहा हजार 261 हेक्टर क्षेत्रावर खरिपाच्या पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. पेरण्यांची ही टक्केवारी 74 टक्के इतकी आहे. जिल्ह्यात सोयाबीन पिकाची तीन लाख 64 हजार 473 हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे तर खरिपातील मुगाची 3854 हेक्टर उडीदाची 15 हजार 34 हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई उद्भवण्याची शक्यता आहे कारण जिल्ह्यातील 227 सिंचन प्रकल्पापैकी 10 सिंचन प्रकल्प अद्यापही कोरडे ठाक तर  उर्वरित सिंचन प्रकल्पात एकूण पाणीसाठा क्षमते पैकी दहा टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. आगामी काळात मोठ्या पावसाची जिल्ह्याला प्रतीक्षा आहे. --देविदास पाठक  आकाशवाणी वार्ताहर, धाराशिव.**

हे प्रादेशिक बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

**पेपरफुटी/केंद्रीय मंत्रिमंडळ**

केंद्रीय मंत्रिमंडळानं काल जलद गती न्यायालये स्थापन करण्यासाठीच्या आणि पेपरफुटी तसंच परीक्षा फसवणूक प्रकरणांमध्ये कठोर शिक्षा निश्चित करण्यासाठीच्या विधेयक मसुद्याला मंजूरी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल ही बैठक झाली. संसदेत येत्या आठवड्यात हे विधेयक मांडलं जाण्याची शक्यता

आहे. यामध्ये जलदगती न्यायालयांची स्थापना, पेपरफुटीच्या संघटीत प्रयत्नांना रोखण्यासाठी 10 कोटी रुपयांपर्यंतचा दंड आणि 10 वर्षांपर्यतच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

**जलदगतीन्यायालय**

नीटसह विविध परीक्षांमधल्या गैरप्रकारांशी संबंधित गुन्ह्यांच्या खटल्यांसाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद आणि नागपूरच्या खंडपीठांमधे विशेष न्यायालयं स्थापन करण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयानं छत्रपती संभाजीनगरचे अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी एस. व्ही. पवार आणि नागपूरचे अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी गुलशन कोलते यांची विशेष न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे. 'सार्वजनिक परीक्षा-अयोग्य मार्गांचा प्रतिबंध-कायद्या'अंतर्गत येणाऱ्या गुन्ह्यांच्या खटल्यांसाठी ही न्यायालयं काम करतील. 2024 च्या या कायद्यानुसार, अशा प्रकरणांमधल्या खटल्यांची प्रक्रिया 3 महिन्यांच्या आत पूर्ण करणं आवश्यक आहे.

दिल्ली उच्च न्यायालयानं अशा खटल्यांच्या सुनावणीसाठी अनु ग्रोव्हर बालीगा यांची विशेष न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे.

दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणी महाराष्ट्रातला आरोपी शिवराज मोटेगावकर याचा जामीन अर्ज विशेष न्यायाधीश अजय गुप्ता यांनी फेटाळला आहे.

**NTA**

'नॅशनल टेस्टिंग एजन्सी' NTA ने 47 अधिकाऱ्यांना सेवेतून कार्यमुक्त केलं आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, यातील काही अधिकाऱ्यांवर कायदेशीर आणि फौजदारी कारवाईही केली जाणार आहे.

दरम्यान NTA ने 'महाव्यवस्थापक' स्तरावरील वरिष्ठ पदांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली असून 'केंद्रीय लोकसेवा आयोगा'च्या 'प्रतिभा सेतू' पोर्टलद्वारे 16 युवकांची नियुक्ती करण्याची प्रक्रियाही सुरू केली आहे.

**अधिवेशन**

नीट पेपेरफुटीशी संबंधित विविध मुद्द्यावरून विरोधकांनी केलेल्या गदरोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज कालही दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. तत्पूर्वी “राष्ट्रीय गौरवाचा अपमान प्रतिबंधक विधेयक” काल राज्यसभेत सादर करण्यात आलं. केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी हे विधेयक सादर केलं. “वंदे मातरम्” या राष्ट्रीय गीताचा अपमान करणं, अथवा त्यात व्यत्यय आणण्याला गुन्हा ठरवण्याची तरतूद या विधेयकात आहे.

**पालघर**

पालघर जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. डहाणू, तलासरी आणि पालघर तालुक्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. मात्र जिल्हा प्रशासन, एनडीआरएफ, अग्निशमन दल, स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामस्थ यांच्या समन्वित प्रयत्नांमुळे शेकडो नागरिकांची सुरक्षित सुटका करण्यात आली. 23 आणि 24 जुलैला राबवण्यात आलेल्या बचाव मोहिमांमध्ये विविध यंत्रणांनी 244 नागरिकांची सुरक्षित सुटका केली.

**नाशिक**

नाशिकमध्ये गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसानं काल काहीशी उसंत घेतली असली तरी, गोदावरी नदीची पूरस्थिती कायम आहे. गोदावरी नदीपात्रात सुमारे 19 हजार, तर नांदूर-मधमेश्वर धरणातून 94

हजार 497 क्यूसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. निफाड तालुक्यातील सायखेडा, चांदोरी गावात पूराचं पाणी शिरलं असून, हजारो हेक्टर क्षेत्र पाण्याखाली गेले आहे.

पुण्यातही पावसाची संततधार कायम असून धरणांमधील पाणीसाठा वाढला आहे. खडकवासला आणि पवना धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

**क्रिकेट**

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये, हरारे इथं आज भारत आणि यजमान झिम्बाब्वे यांच्यात दुसरा टी-20 आंतरराष्ट्रीय सामना खेळला जाईल. भारतीय वेळेनुसार सायंकाळी साडे 4 वाजता सामना सुरू होईल. गुरुवारी झालेल्या पहिल्या सामन्यात सातगडी राखून विजय मिळवत भारतानं तीन सामन्यांच्या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे.

**हवामान**

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी कालही मध्यम ते जोरदार पाऊस पडला. मराठवाड्यात अद्याप पावसाचा जोर कमी आहे. आज विदर्भ, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. मराठवाड्यात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**